**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
प्रशासकीय इमारत, प्रा.अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
Email : info@sra.gov.in
दुरध्वनी क्र.२६५६५८००, ६५९०४०५/१८७१
फॅक्स क्र. ०२२-२६५९०४५७

परिपत्रक क्र. १५२

क्र. झोपुप्रा/सनिस/परिपत्रक/१०४७/२०१५
दिनांक : ०५ जुन, २०१५

**विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत परिशिष्ट- २ मधील पात्र झोपडीधारक मयत झाल्यास त्यांचे कायदेशीर वारसांचे पात्रतेबाबत व संस्थेतील सभासदत्वाबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या उपरोक्त विषयासंदर्भात परिपत्रक क्र. ९४, दिनांक ०६/०४/२००१ व परिपत्रक क. १३९, दिनांक १८/०९/२०१२ रद्द करुन खालीलप्रमाणे नविन परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१) परिशिष्ट- २ मध्ये पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीमध्ये सदनिका/गाळयांचे वाटप होण्यापुर्वी :-

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत संबंधित सक्षम प्राधिकारी (Competent Authority) यांचेकडून परिशिष्ट- २ मध्ये झोपडीधारकांची पात्रता निश्चित झाल्यानंतर सदर परिशिष्ट- २ मधील मूळ पात्र झोपडीधारक मयत झाल्यास अशा पात्र झोपडीधारकाचे वारसांचे नाव परिशिष्ट- २ मध्ये समाविष्ट करणेसाठी उपजिल्हाधिकारी, झो.पु.प्रा. यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज करावा. पात्र झोपडीधारक हा॰पती असेल तर त्यांच्या मृत्युनंतर त्याच्या पत्नीचे व पत्नी असेल तर तिच्या मृत्युनंतर तिच्या पतीचे नाव वारस म्हणून दाखल करणेची कार्यवाही करण्यात यावी. तथापि, पात्र सर्व झोपडीधारक पती व पत्नी हे दोघेही मयत झाल्यास त्यांचा मुलगा/मुलगी या सर्व वारसांची वारस म्हणून नोंद करण्याची कार्यवाही / स्थानिक चौकशी करुन करण्यात येईल. इतर वारसांच्या नोंदीबाबत सक्षम न्यायालयाचा दाखला किंवा Letter of Administration यापैकी संबंधित प्रकरणी जे लागू असेल ते मूळ कागदपत्र घेवून त्या वारसाचे नाव परिशिष्ट- २ मध्ये मयत

झोपडीधारकाच्याऐवजी समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येईल. वारसाबाबत वाद असल्यास तर अशा प्रकरणांमध्ये सक्षम न्यायालयाचा दाखला सादर करणे गरजेचे आहे.

२) परिशिष्ट- २ मध्ये पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीमध्ये सदनिका / गाळयांचे वाटप <u>झाल्यानंतर</u> :-

परिशिष्ट- २ मध्ये पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीमधील सदनिकेचे / गाळयाचे वितरण झाल्यानंतर परिशिष्ट- २ मधील मूळ पात्र व्यक्ती मयत झाल्यानंतर त्यांचे सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदत्व व सदनिकेचे हस्तांतरण त्या योजनेच्या नोंदणीकृत सहकारी संस्थेने त्यांच्या स्तरावर करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहिल.

अ) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत निर्मित करण्यात आलेल्या परिशिष्ट- २ मध्ये पती व पत्नी हे संयुक्त पात्र ठरलेले असतात त्यामुळे पती व पत्नी त्यांच्या सहकारी संस्थेचे संयुक्त सभासद असतील व त्यांना वाटप झालेली सदनिका ही त्यांच्या संयुक्त नावे आहे. सदर पती/पत्नी यांपैकी एकाचे निधन झाल्यानंतर संस्थेचे सभासदत्व आणि सदनिका ही मृत्यू पावलेल्या पात्र झोपडीधारकाच्या पती अथवा पत्नी (Spouse) यांच्या नावाने सहकारी संस्थेच्या स्तरावर हस्तांतरीत करण्यात यावी.

तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेने संस्थेच्या पोटनियम क्र. ३२ प्रमाणे कायदेशीर वारस म्हणून त्यांचे संस्थेतील सभासदत्व, सदनिका हस्तांतरण करण्याची कारवाई संस्थेची आदर्श उपविधीमधील क्र. १७ व १९ नूसार करावी.

ब) परिशिष्ट- २ मधील पात्र झोपडीधारक पती/पत्नी या दोघांचे निधन झाल्यानंतर त्यांचे सभासदत्व व सदनिका हस्तांतरण करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(I) पती/पत्नी या दोघांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबातील त्यांची आई, वडील, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, जावई, सून, नातु, नाती या त्यांच्या नातेवाईकांनी संस्थेचे सभासदत्व व सदनिका हस्तांतरण करण्यासाठी संस्थेकडे अर्ज केल्यास संस्थेच्या आदर्श उपविधीमधील क्र. ३५, ३६, ३८ व ३९ प्रमाणे कारवाई करुन संस्था स्तरावर हस्तांतरण करण्यात यावे.

(II) उपरोक्त नमुद नातेवाईकांशिवाय इतर नातेवाईकांच्या नावाने हस्तांतरणाबाबत संस्थेस अर्ज प्राप्त झाला असेल तर संस्थेने वारसाबाबत सक्षम न्यायालयाचे वारसप्रमाणपत्र किंवा Letter of Administration या संबंधितांपैकी जे लागू असेल ते घेवून त्या वारसाच्या नावे सभासदत्व व सदनिकेचे हस्तांतरण करण्यात यावे.

उपरोक्त तरतुदीप्रमाणे संस्था स्तरावर हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सहकारी गृहनिर्माण संस्थेने याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास अवगत करावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.